0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई यांचा दि.०८/०२/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.११/२०११/जा.१२९, दि.१७/०२/२०११, ०५/०३/२०११, २३/०३/२०११, ०१/०४/२०११, २०/०४/२०११ व ०३/०५/२०११.

३) गोडावून क्र. १, ३ व ४ चे मालक सोहराब अहमद अब्दुल खालक शेख, गोडावून क्र. ७ चे संबंधीत अब्दुल मजीद यार महमंद कुरेशी, गोडावून क्र. १० चे संबंधीत इबले हसन अली हसन शेख, गोडावून क्र. ५ चे संबंधित महमंद असरफ हस्मतअली, गोडावून क्र. ८ व ९ चे संबंधीत महमंद ईलीयास यांचे दिनांक ३०/०३/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदन.

४) गोडावून क्र.६ शी संबंधीत श्रीमती कमरुनिसा कुरेशी यांचे दि.०६/०४/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.

५) गोडावून क्र.२ शी संबंधीत तनविर ईकरामुल हक खॉन यांचे दि.१८/४/११ रोजीचे लेखी निवेदन.

६) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे यांचे दि.२७/०४/२०११ रोजीचे अभिवेदन.

७) गोडावून क्र. १३ चे संबंधित मोहम्मद रफिक हमीदुल्लाह शेख, गोडावून क्र. १६ चे संबंधित मेहंदीहसन हाजी जैनल्लाह, गोडावून क्र. १७ चे संबंधित मोहम्मद अनिस मोईनुद्दीन खान यांचे ॲड. एच.एस. आनंद यांचेमार्फत प्राप्त दि.१९/०४/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

८) गोडावून क्र. १३ चे संबंधित नाज पेट्रोलियमचे मालक मोहम्मद रफिक हमीदुल्लाह शेख यांचे दि.२०/०५/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.

९) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे यांचे दि.१४/०६/२०११ रोजीचे अभिवेदन.

१०) गोडावून क्र. ११ चे संबंधित अहम्मद हुसेन नजर मो. खान याचे दि.१८/०७/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

११) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे यांचे दि.१९/१०/२०११ रोजीचा रासायनिक पृथ:करण अहवाल.

१२) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे यांचे दि.२३/११/२०११ रोजीचा अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.११/२०११/जा.८७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५.वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक : १८/०२/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

किस्मत नगर, नशिबुल्लाह कम्पाउंड, मिठी नदीच्या किनारी, कुर्ला कलीना रोडच्या दक्षिण बाजूस काही इसम तेलाची भेसळ करुन साठा करतात, अशी खात्रीलायक खबर दिनांक २८/०१/२०११ रोजी कुर्ला पोलिस स्टेशनला मिळाल्यावरुन तेथील अधिकाऱ्यांनी दोन पंचासह मिठी नदीच्या किनारी असलेल्या गोडावूनची तपासणी करुन झडती घेतली असता, खालील गोडावूनमध्ये भेसळीचे साहित्य तसेच भेसळ केलेले ऑईल मिळून आले. सदर जागेमध्ये सतरा गोडावून असून प्रत्येक गोडावूनची तपासणी केली असता खालीलप्रमाणे भेसळ केलेले ऑईल व साहित्य मिळून आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | गोडावून क्र. १ मध्ये ११२ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच ९५ रिकामे ड्रम व दोन लोखंडी हौदामध्ये ३०० लिटर भेसळयुक्त तेल | ४,८९,४००/- |
| २ | गोडावून क्र. २ मध्ये ८ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच १३४ रिकामे ड्रम, १० प्लॅस्टिकचे रिकामे ड्रम व दोन लोखंडी हौदामध्ये २०० लिटर भेसळयुक्त तेल व ३ हॉर्सपॉवरच्या दोन मोटार | ७६,१००/- |
| ३ | गोडावून क्र. ३ मध्ये ३४ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच २१० रिकामे ड्रम व एक लोखंडी हौदामध्ये १५० लिटर भेसळयुक्त तेल व ३ हॉर्सपॉवरची एक मोटार | १,५२,०००/- |
| ४ | गोडावून क्र. ४ मध्ये ३३ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच २० रिकामे ड्रम व १८ प्लॅस्टिकचे कॅन | १,४३,५००/- |
| ५ | गोडावून क्र. ५ मध्ये ३८ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच ५४ रिकामे ड्रम | १,७०,४००/- |
| ६ | गोडावून क्र. ६ मध्ये २० लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच १० रिकामे ड्रम | ८६,०००/- |
| ७ | गोडावून क्र. ७ मध्ये ४० लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी १५० लिटर तसेच ३२ रिकामे ड्रम | १,७४,४००/- |
| ८ | गोडावून क्र. ८ मध्ये ३ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच ९ रिकामे ड्रम | ३,६००/- |
| ९ | गोडावून क्र. ९ मध्ये १५ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच १५ रिकामे ड्रम | १२,०००/- |
| १० | गोडावून क्र. १० मध्ये १० लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच ५ रिकामे ड्रम | ५३,०००/- |
| ११ | गोडावून क्र. ११ मध्ये १४ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच २५ रिकामे ड्रम | ६३,८००/- |

| | | |
|---|---|---|
| १२ | गोडावून क्र. १२ मध्ये ४५ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच ११३ रिकामे ड्रम, एक ६ बाय ८ चा हौद | ४९,६००/- |
| १३ | गोडावून क्र. १३ मध्ये २० लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच १२२ रिकामे ड्रम | १,०८,४००/- |
| १४ | गोडावून क्र. १४ मध्ये १२ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच ५४ रिकामे ड्रम | ६१,२००/- |
| १५ | गोडावून क्र. १५ मध्ये २२ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच १९४ रिकामे ड्रम | १,२१,२००/- |
| १६ | गोडावून क्र. १६ मध्ये २८ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच ८४ रिकामे ड्रम | १,२४,४००/- |
| १७ | गोडावून क्र. १७ मध्ये २६ लोखंडी ड्रम काळया तेलाने भरलेले प्रत्येकी २०० लिटर तसेच १२३ रिकामे ड्रम | १,३३,८००/- |
| | एकूण | २०,२२,८००/- |

उपरोक्त गोडावून क्र. १ ते ४ चा मालक सोहराब असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले असून, इतर गोडावूनचे मालक व चालक हे सुध्दा पाहिजे आरोपी असल्याने त्यांचा शोध चालू आहे. सदर छाप्याच्यावेळी इसम नामे अनिल वसंत पटेल हे मिळून आल्याने त्यास कारवाई कामी पोलिसांनी ताब्यात घेण्यात आले. तसेच सदर मिठी नदीच्या किनारी असलेल्या गोडावूनमध्ये भेसळयुक्त व भेसळयुक्त तेलामधून निघालेला टाकाऊ माल हा मिठी नदीमध्ये सोडला जात होता असे निदर्शनास आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन खराब लुब्रिकेंट ऑईलमध्ये केमिकल ऑईल मिक्स करुन सदरचे भेसळयुक्त ऑईल हे खरे आहे, असे भासवून ते किरकोळ व घाऊक भावात विकून फसवणूक करतात, तसेच सदर ऑईल साठवणूक करण्याची परवानगी नसतांना असुरक्षितपणे व बेकायदेशिररित्या साठवणूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) भा. दं. वि. चे कलम ४२० (२) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन ऑर्डर - १९८७ चे कलम ३, ४ (३) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल, स्टोरेज ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल) (अनुज्ञापन) ऑर्डर २००७ चे कलम ३, ४ (४) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२), ८ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३१/२०११, दि.२९/०१/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन उपरोक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली

असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०४/०३/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०४/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दि.२१/०३/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०३/२०११ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दि.३०/०३/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दि.३०/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस गोडावून क्र. १, ३ व ४ चे मालक सोहराब अहमद अब्दुल खालक शेख, गोडावून क्र. ७ चे संबंधीत अब्दुल मजीद यार महमंद कुरेशी, गोडावून क्र. १० चे संबंधीत इबले हसन अली हसन शेख, गोडावून क्र. ५ चे संबंधित महमंद असरफ हस्मतअली, गोडावून क्र. ८ व ९ चे संबंधीत महमंद ईलीयास हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस गोडावून १३ चे संबंधीत मोहम्मद रफिक व गोडावून क्र. १६ चे संबंधीत मेहंदी हसन हाजी जैनुल्लाह हे उपस्थित राहिले व त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची लेखी विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१८/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस गोडावून क्र. २ चे संबंधीत तनविर ईकरामुल हक खॉन हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र.५ अन्वये लेखी निवेदन सादर केले. दरम्यान गोडावून क्र. ६ चे संबंधीत श्रीमती कमरुनिसा कुरेशी यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.२८/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २८/४/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. अे.आर. बोढारे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस गोडावून क्र. १३ चे संबंधित मोहम्मद रफिक हमीदुल्लाह शेख, गोडावून क्र. १६ चे संबंधित मेहंदीहसन हाजी जैनुल्लाह, गोडावून क्र. १७ चे संबंधित मोहम्मद अनिस मोईनुद्दीन खान हे उपस्थित राहून त्यांनी त्यांचे वकील ॲड. एच.एस. आनंद यांच्यामार्फत वाचावे क्र. ७ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर

सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक १९/०५/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १९/०५/२०११ रोजीच्या सुनावणीसही आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देऊन देखील यापैकी कोणीही सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलल्या गोडावून मधील द्रवपदार्थ काळे तेल असल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे. त्यामुळे जप्त केलेला द्रवपदार्थाबाबत अंतीम निर्णय घेण्यापूर्वी सदरचा पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याची सत्यसत्यता पडताळणीसाठी रासायनिक पृथःकरण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याने सदरचा पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तदनंतर जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथःकरण अहवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे यांनी त्यांचे वाचावे क्र. ११ अन्वये या कार्यालयास सादर केला. सदर रासायनिक पृथःकरण अहवालामध्ये, १) Exhibit nos. १ ते १७, १९ व २१ यामध्ये वेस्ट पेट्रोलियम हायड्रोकार्बन ऑईल, २) Exhibit nos. १८ व २० यामध्ये ल्युब्रिकेटिंग ऑईल, ३) Exhibit no. २२ यामध्ये वेस्ट पेट्रोलियम हायड्रोकार्बन ऑईल व ४) Exhibit no. २३ यामध्ये अर्थ मिक्स्ड विथ पेट्रोलियम हायड्रोकार्बन्स असे नमूद आहे.

प्रस्तुत प्रकरणी १७ गोडावूनमधून मुद्देमाल जप्त केला असल्यामुळे उपरोक्त पृथःकरण अहवालामध्ये नमूद नमूने (exhibits) हे कोणत्या गोडावूनमधील आहेत, याचा बोध होत नसल्याने वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असता, सदरचा गोडावून निहाय अहवाल वाचावे क्र. १२ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांनी सादर केला.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

## युक्तिवाद :-

दिनांक ३०/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. १, ३ व ४ चे मालक सोहराब अहमद अब्दुल खालक शेख यांनी युक्तीवाद केला की, तो गोडावून क्र. १, ३, ४ चा मालक असून, त्याची कागदपत्रे त्यांनी निवेदनासोबत जोडली आहेत. ते रिक्लेमंड युझ ऑईल, रिक्लेमंड ऑईल व ल्युब ऑईल ट्रेडिंगचा व्यवसाय करीत असून, सदरचे ऑईल ते कंपनीकडून खरेदी करुन त्यांची इतर कंपनीला विक्री करतात. त्याकरीता त्याच्याकडे इंडस्ट्रीयल लायसन्स व महानगर पालिकेचा साठवणूक व गुमास्ता लायसन्स असून ते निवेदना सोबत जोडले आहे. त्याप्रमाणे त्याने रिक्लेमंड युझ ऑईल, रिक्लेमंड ऑईल व ल्युब ऑईल खरेदी, विक्री केलेली बिले निवेदनासोबत जोडली आहेत. सदरचा व्यवसाय तो चेकद्वारे करतो. त्याने कोणतेही गैरकानुनी काम केलेले नसून, जप्त केलेले

ऑईल अत्यावश्यक कायद्यामध्ये येत नाही. त्याच्याकडे असलेल्या लायसन्सनुसार तो ट्रेडिंगचा व्यवसाय करीत आहे. तरी त्याचे गोडावून क्र. १, ३, ४ मधून जप्त केलेला ऑईल साठा त्याला प्रत मिळावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ३०/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. ७ चे संबंधीत अब्दुल मजीद यार महंमद कुरेशी यांनी युक्तीवाद केला की, तो रेशनिंगचा माल विकत नाही. ल्युब्रिकेटींग ऑईलचा माल त्याच्याकडे असतो. गाळा क्र. ७ मध्ये रुपये ५०,०००/- किमतीचा माल होता. तो इम्तियाज खानकडून गाळा भाड्यावर घेऊन धंदा करतो, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ३०/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. १० चे संबंधीत इबले हसन अली हसन शेख यांनी युक्तीवाद केला की, तो रेशनिंगचा माल विकत नाही. ल्युब्रिकेटींग ऑईलचा माल त्याच्याकडे असतो. गाळा क्र. १० मध्ये रुपये ५३,०००/- किमतीचा माल आहे. तो इरफान खानकडून गाळा भाड्यावर घेऊन धंदा करतो, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ३०/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. ५ चे संबंधित महमंद असरफ हस्मतअली यांनी युक्तीवाद केला की, त्याच्याकडे रेशनिंगचा माल नसून ल्युब्रिकेटिंग ऑईलचा माल आहे. तसेच पोलिसांनी माल रुपये १,७०,०००/- लिहिला आहे परंतू गोदामामध्ये रुपये ३०,०००/- किमतीचा माल आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ३०/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. ८ व ९ चे संबधीत महमंद ईलीयास यांनी युक्तीवाद केला की, तो रेशनिंगचा माल विकत नाही. ल्युब्रिकेटींग ऑईलचा माल त्याच्याकडे असतो. गाळा क्र. ८ मध्ये रुपये ३,६००/- रुपयांचा व गाळा क्र. ९ मध्ये १२,०००/- रुपये किमतीचा माल आहे. दोन्ही गाळा त्यांनी रयाज खानकडून धंदा करण्यासाठी भाडयावर घेतले आहेत, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

गोडावून क्र.६ चे संबंधीत श्रीमती कमरुनिसा कुरेशी यांनी दि.०६/०४/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, गोडावून क्र. ६ चे मालक तिचे पती अब्दुल खालीक नबी अहमद कुरेशी हे आहेत. ते गेल्या सहा महिन्यापासून कोमामध्ये असून त्याबाबतचे वैद्यकीय कागदपत्रे सोबत जोडत आहे. अब्दुल खालीक नबी अहमद कुरेशी हे कोमामध्ये असल्यामुळे गेल्या ६ महिन्यापासून गोडावून बंद आहे. ते रिक्लेमंड युझ ऑईल/ट्रेडिंगचा व्यवसाय करीत असून, हे ऑईल ते कंपनीकडून खरेदी करुन त्याचा इतर कंपनीला विक्री करतात. त्याकरिता त्यांच्याकडे इंडस्ट्रीयल लायसन्स व महानगर पालिकेचा साठवणूक व गुमास्ता लायसन्स असून ती सादर केली. त्याप्रमाणे रिक्लेमंड युझ ऑईल खरेदी व विक्री केलेली बिले सोबत जोडली आहेत. त्यांनी कोणतेही गैरकानूनी काम केलेले नसून जप्त केलेले ऑईल अत्यावश्यक कायद्यामध्ये येत नाही. त्यांच्याकडे असलेल्या लायसन्सनुसार ते

ट्रेडिंगचा व्यवसाय करीत आहे. तरी त्यांच्या गोडावून क्र. ६ मधून जप्त केलेला ऑईलसाठा त्यांना परत मिळावा, असे नमूद केले आहे.

दिनांक ०१/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र.२ चे संबंधीत तनविर ईकरामुल हक खॉन यांनी युक्तीवाद केला की, तो गोडावून क्र. २ चा मालक असून, हे गोडावून मे. समीर ट्रेडर्स या नावाने चालवित आहे. त्याचे गोडावून दि.२८/०१/२०११ रोजी पोलिसांनी टाकलेल्या धाडीपासून बंद केले आहे. त्याच्या गोडावूनमध्ये भेसळयुक्त काळे तेल ठेवलेले आहे, या संशयावरुन पोलिसांनी त्याच्यावर केस करुन मालाचा साठा जप्त केलेला आहे. परंतू तो वेस्ट स्क्रॅप ऑईल खरेदी व विक्री करण्याचा व्यवसाय करीत असून, त्याच्या गोडावूनमध्ये वेस्ट स्क्रॅप ऑईलचा साठा ठेवलेला होता. हा साठा त्याने नवनीत मोटर्स प्रा.लि. यांचेकडून दि.१६/१२/२०१० रोजी ५ ड्रम दि.२८/१२/२०१० रोजी ५ ड्रम व दि.५/०१/२०११ रोजी ५ ड्रम याप्रमाणे खरेदी केला होता. त्याची बिले सादर केली आहेत. हा व्यवसाय करण्यासाठी त्याच्याकडे महाराष्ट्र शासन औद्योगिक विभागाचा ट्रेडिंगचा लायसन्स आहे. तसेच पोलूशन विभागाने व्यवसाय करण्याबाबत एन.ओ.सी. दिलेली आहे. तसेच अग्नीशमन दलाचा परवाना आहे. सदर पुराव्यावरुन असे निदर्शनास येईलच की, तो कोणत्याही प्रकारची भसेळ करीत नसून, वेस्ट स्क्रॅप ऑईल खरेदी करुन ते रिकात्या ड्रममध्ये भरुन विक्री करण्याचा व्यवसाय करतो. त्याच्याकडे सर्व लायसन्स असतांना पोलिसांनी त्याच्या मालाचा साठा का जप्त केला आहे, हे त्याला समजत नाही. त्याच्याकडे असलेल्या परवान्यानुसार ते प्रामाणिकपणे त्यांचा व्यवसाय करतो. गेल्या ३-४ महिन्यापासून त्याचा धंदा बंद असल्याने त्याचे खुप आर्थिक नुकसान झाले आहे. या व्यवसायावरच त्याच्या कुटुंबाचे उदरनिर्वाह चालत आहे. तरी त्याच्या जप्त केलेल्या मालामध्ये कोणतीही भेसळ केली नसून, वेस्ट स्क्रॅप ऑईल हे जीवनावश्यक वस्तू कायद्यामध्ये येत नसल्याने त्याचा जप्त केलेला मालाचा साठा त्याला परत मिळावा. तसेच त्याला व्यवसाय करण्यासाठी त्याच्या गोडावूनला लावलेले टाळे काढून द्यावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. १३ चे संबंधित मोहम्मद रफिक हमीदुल्लाह शेख यांचे वतीने ॲड. एच.एस. आनंद यांनी युक्तीवाद केला की, त्यांचे अशिल नमूद गोदामावर व्यवसाय करीत असून त्याकरिता त्यांचे अशिलाकडे आवश्यक कागदपत्रे आहेत. परंतू सद्य:स्थितीत गहाळ झाले असल्याने त्यांचे अशिल सादर करु शकत नाहीत. साकीनाका पोलिस ठाणे येथे त्यांच्या अशिलावर भेसळयुक्त ऑईलचा व्यवसाय करीत असल्याचे नमूद करुन जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्या अशिलावर सदरचा व्यवसाय विनापरवाना करीत असल्याचा आरोप असून, हा आरोप त्यांना अमान्य आहे. त्यांचे अशिल हे बेस ऑईलचा व्यापार करीत असल्याने ते याबाबतच्या कोणत्याही निर्मिती प्रक्रियेत नसल्याने त्यांच्या अशिलाला ल्युब्रिकेटिंग ऑईल ॲण्ड ग्रिसेस १९८७ चे कलम २ (सी) लागू होत नाही. त्यामुळे कुर्ला पोलिस

ठाणे यांनी दाखल केलेला गुन्हा योग्य नसल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या अशिलाला बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस ही पोलिस अहवालाच्या आधारे असून त्यामध्ये त्यांचे अशिल सदरचा व्यवसाय विनापरवाना करीत असल्याचे नमूद आहे. तथापी, त्यांच्या अशिलाकडे साठवणूकीकरिता डायरेक्टर ऑफ इन्डस्ट्री व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील परवाना आहे. त्यांच्या अशिलावर संबंधित पोलिस ठाणेकडून आरोपपत्र दाखल करण्यात आले नसल्याने त्याच्या अशिला वरील आरोप सिध्द होत नाहीत. सदर प्रकरणी कुर्ला पोलिस ठाणे यांनी जप्त केलेला मुद्देमाल व त्याअनुषंगाने दाखल केलेला गुन्ह्यानुसार जीवनावश्यक वस्तू कादद्याअंतर्गत बजावण्यात आलेल्या नोटीसामध्ये त्यांचे अशिल हे प्रोसेसर नसतानाही पोलिसांनी त्यांचे अशिल हे बेस ऑईलचे प्रोसेसर व उत्पादक असल्याचे दर्शवून गुन्हा दाखल केला असून घटनास्थळी पोलिसांना उत्पादनाशी संबंधित कोणतेही साहित्य मिळालेले नाही. प्रस्तूत प्रकरणी त्यांचे अशिल आपल्या कार्यालयाशी सहकार्य करण्यास तयार असून त्यांचेवरील आरोप बिनबुडाचे असल्याने बजावण्यात आलेली नोटीस परत घेण्याबाबत विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. १६ चे संबंधित मेहंदीहसन हाजी जैनुल्लाह यांचे वतीने ॲड. एच.एस. आनंद यांनी युक्तीवाद केला की, त्यांचे अशिल नमूद गोदामावर व्यवसाय करीत असून त्याकरिता त्यांचे अशिलाकडे आवश्यक कागदपत्रे आहेत. परंतू सद्य:स्थितीत गहाळ झाले असल्याने त्यांचे अशिल सादर करु शकत नाहीत. कुर्ला पोलिस ठाणे येथे त्यांच्या अशिलावर भेसळयुक्त ऑईलचा व्यवसाय करीत असल्याचे नमूद करुन जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्या अशिलावर सदरचा व्यवसाय विनापरवाना करीत असल्याचा आरोप असून, हा आरोप त्यांना अमान्य आहे. त्यांचे अशिल हे बेस ऑईलचा व्यापार करीत असल्याने ते याबाबतच्या कोणत्याही निर्मिती प्रक्रियेत नसल्याने त्यांच्या अशिलाला ल्युब्रिकेटिंग ऑईल ॲण्ड ग्रिसेस १९८७ चे कलम २ (सी) लागू होत नाही. त्यामुळे कुर्ला पोलिस ठाणे यांनी दाखल केलेला गुन्हा योग्य नसल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या अशिलाला बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस ही पोलिस अहवालाच्या आधारे असून त्यामध्ये त्यांचे अशिल सदरचा व्यवसाय विनापरवाना करीत असल्याचे नमूद आहे. तथापी, त्यांच्या अशिलाकडे साठवणूकीकरिता डायरेक्टर ऑफ इन्डस्ट्री व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील परवाना आहे. त्यांच्या अशिलावर संबंधित पोलिस ठाणेकडून आरोपपत्र दाखल करण्यात आले नसल्याने त्याच्या अशिला वरील आरोप सिध्द होत नाहीत. सदर प्रकरणी कुर्ला पोलिस ठाणे यांनी जप्त केलेला मुद्देमाल व त्याअनुषंगाने दाखल केलेला गुन्ह्यानुसार जीवनावश्यक वस्तू कादद्याअंतर्गत बजावण्यात आलेल्या नोटीसामध्ये त्यांचे अशिल हे प्रोसेसर नसतानाही पोलिसांनी त्यांचे अशिल हे बेस ऑईलचे प्रोसेसर व उत्पादक असल्याचे दर्शवून गुन्हा दाखल केला असून घटनास्थळी पोलिसांना उत्पादनाशी संबंधित कोणतेही साहित्य

मिळालेले नाही. प्रस्तुत प्रकरणी त्यांचे अशिल आपल्या कार्यालयाशी सहकार्य करण्यास तयार असून त्यांचेवरील आरोप बिनबुडाचे असल्याने बजावण्यात आलेली नोटीस परत घेण्याबाबत विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०४/२०११ रोजीच्यां सुनावणीस उपस्थित गोडावून क्र. १७ चे संबंधित मोहम्मद अनिस मोईनुद्दीन खान यांचे वतीने ॲड. एच.एस. आनंद यांनी युक्तीवाद केला की, त्यांचे अशिल नमूद गोडामावर व्यवसाय करीत असून त्याकरिता त्यांचे अशिलाकडे आवश्यक कागदपत्रे आहेत. परंतू सद्य:स्थितीत गहाळ झाले असल्याने त्यांचे अशिल सादर करु शकत नाहीत. कुर्ला पोलिस ठाणे येथे त्यांच्या अशिलावर भेसळयुक्त ऑईलचा व्यवसाय करीत असल्याचे नमूद करुन जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्या अशिलावर सदरचा व्यवसाय विनापरवाना करीत असल्याचा आरोप असून, हा आरोप त्यांना अमान्य आहे. त्यांचे अशिल हे बेस ऑईलचा व्यापार करीत असल्याने ते याबाबतच्या कोणत्याही निर्मिती प्रक्रियेत नसल्याने त्यांच्या अशिलाला ल्युब्रिकेटिंग ऑईल ॲण्ड ग्रिसेस १९८७ चे कलम २ (सी) लागू होत नाही. त्यामुळे कुर्ला पोलिस ठाणे यांनी दाखल केलेला गुन्हा योग्य नसल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या अशिलाला बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस ही पोलिस अहवालाच्या आधारे असून त्यामध्ये त्यांचे अशिल सदरचा व्यवसाय विनापरवाना करीत असल्याचे नमूद आहे. तथापी, त्यांच्या अशिलाकडे साठवणूकीकरिता डायरेक्टर ऑफ इन्डस्ट्री व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील परवाना आहे. त्यांच्या अशिलावर संबंधित पोलिस ठाणेकडून आरोपपत्र दाखल करण्यात आले नसल्याने त्यांच्या अशिला वरील आरोप सिध्द होत नाहीत. सदर प्रकरणी कुर्ला पोलिस ठाणे यांनी जप्त केलेला मुद्देमाल व त्याअनुषंगाने दाखल केलेला गुन्ह्यानुसार जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत बजावण्यात आलेल्या नोटीसामध्ये त्यांचे अशिल हे प्रोसेसर नसतानाही पोलिसांनी त्यांचे अशिल हे बेस ऑईलचे प्रोसेसर व उत्पादक असल्याचे दर्शवून गुन्हा दाखल केला असून घटनास्थळी पोलिसांना उत्पादनाशी संबंधित कोणतेही साहित्य मिळालेले नाही. प्रस्तुत प्रकरणी त्यांचे अशिल आपल्या कार्यालयाशी सहकार्य करण्यास तयार असून त्यांचेवरील आरोप बिनबुडाचे असल्याने बजावण्यात आलेली नोटीस परत घेण्याबाबत विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

अहम्मद हुसेन नजर मो. खान यांचे दिनांक १८/०७/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, नसीबुल्ला कंपाऊंड, गाला नं. ११, कालीना रोड, कुर्ला, मुंबई ७० या पत्त्यावरील गोडावून हे त्याच्या नांवे आहे. कुर्ला पोलिस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र. ११/२०११ या गुन्ह्यात त्याच्या गोडावूनमध्ये २८०० लिटर खराब ऑईल पोलिसांनी पकडल्याबाबत आपल्या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळी तो गावाकडे घरगुती कामाकरिता गेला असल्याने येऊ शकला नाही. तो वरील ठिकाणी खराब ऑईलचा धंदा त्याच्या कुटुंबाकरीता करीत

आहे. वरील ठिकाणी मिळालेला खराब ऑईल तो दुसऱ्या तिसऱ्या इसमाकडून खरेदी करुन ते ऑईल तो ग्रीज, बिल्डर अथवा भांडी साफ करणारे यांस देऊन त्याचे कुटुंब सांभाळत आहे व त्याचा वरील ठिकाणी मोठा व्यवसाय नसून किरकोळ धंदा करतो. तरी वरील गोडावूनमध्ये सध्या कचरा पडलेला आहे. तरी त्यास वरील गुन्ह्यातून मुक्त करुन जप्त केलेला खराब ऑईल साठा परत मिळावा, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस ठाणे यांचे दिनांक १९/१०/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेल्या लेखी अभिवेदनात, नमूद गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचे नमुने यापूर्वी रासायनिक विश्लेषणाकरीता न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, सांताक्रुझ, मुंबई या ठिकाणी पाठविण्यात आले होते. सदरबाबतचा रासायनिक विश्लेषकांचा अहवालाची छायांकित प्रत सोबत सादर केली आहे. नमूद गुन्ह्यात एकूण १७ गोडावूनवर कारवाई करण्यात आलेली असून अद्यापपर्यंत १० जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच गोडावून क्र. ६, ८, ९, ११, १४ आणि १५ या गोडावूनचे मालक/चालक मिळून न आल्याने त्यांचा शोध घेत आहोत. तरी रासायनिक विश्लेषकांकडून प्राप्त अहवालाचे अवलोकन करुन मालक/चालक मिळून न आलेल्या नमूद गोडावून क्रमांकाव्यतिरिक्त इतर गोडावूनमधील गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाच्या विल्हेवाटी संदर्भात स्पष्ट आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस ठाणे यांचे दिनांक २३/११/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेल्या लेखी अभिवेदनात, यातील गोडावून क्र. १ ते १७ बॅरेलमधून ताब्यात घेतलेल्या तेलाच्या नमुन्यांना प्रदर्शित (Exhibits) अनुक्रमांक १ ते १७ असे संबोधण्यात आलेले आहे. गोडावून क्र. २ मधील दोन हौदामधून ताब्यात घेतलेल्या तेलाच्या नमूना बाटलीस प्रदर्शित (Exhibits) अनुक्रमांक १९ आणि गोडावून क्र. १२ (सी-२३) मधील हौदामधून ताब्यात घेतलेल्या तेलाच्या नमूना बाटलीस प्रदर्शित (Exhibits) अनुक्रमांक २१ असे संबोधण्यात आले आहे. गोडावून क्र. १ मधील दोन हौदांमधून ताब्यात घेतलेल्या तेलाच्या नमूना बाटलीस प्रदर्शित (Exhibits) अनुक्रमांक १८ आणि गोडावून क्र. ३ मधील हौदामधून ताब्यात घेतलेल्या तेलाच्या नमूना बाटलीस प्रदर्शित (Exhibits) अनुक्रमांक २० असे संबोधण्यात आले आहे. मिठी नदीमधून घेतलेल्या भेसळयुक्त टाकाऊ तेलमिश्रित पाण्याच्या नमूना बाटलीस प्रदर्शित (Exhibits) अनुक्रमांक २२ आणि मिठी नदीच्या किनाऱ्यावरील गोडावून समोरील तेलमिश्रित मातीच्या नमून्यास प्रदर्शित (Exhibits) अनुक्रमांक २३ असे संबोधण्यात आले आहे. नमूद गुन्ह्यात एकूण १७ गोडावूनवर कारवाई करण्यात आलेली असून अद्यापपर्यंत १० जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच गोडावून क्र. ६, ८, ९, ११, १४ आणि १५ या गोडावूनचे मालक/चालक मिळून न आल्याने त्यांचा शोध घेत आहोत. नमूद गुन्ह्यतील एकूण १७ गोडावूनमधील जप्त करण्यात आलेल्या द्रवपदार्थाचे नमून्यांना वर नमूदप्रमाणे प्रदर्शित अनुक्रमांक ०१ ते २३ असे संबोधून रासायनिक पृथ:करणासाठी दिनांक ०२/०२/२०११ रोजी

त्यांच्या पोलिस ठाणेकडून न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले होते. तरी सदर रासायनिक विश्लेषकांकडून प्राप्त अहवालाचे अवलोकन करुन मालक/चालक मिळून न आलेल्या नमूद गोडावून क्रमांकाव्यतिरिक्त इतर गोडावूनमधील गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाच्या विल्हेवाटी संदर्भात स्पष्ट आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २८/०१/२०११ रोजी कुर्ला पोलिस स्टेशनला मिळालेल्या बातमीवरुन तेथील अधिकाऱ्यांनी दोन पंचांसह किस्मत नगर, नशिबुल्लाह कम्पाउंड, कुर्ला कलीना रोडच्या दक्षिण बाजूस, मिठी नदीच्या किनारी असलेल्या १७ गोडावूनची तपासणी करुन झडती घेतली असता, सदर १७ गोडावूनमध्ये भेसळीचे साहित्य तसेच भेसळ केलेले ऑईल मिळून आले. उपरोक्त गोडावून क्र. १ ते ४ चा मालक सोहराब असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले असून, इतर गोडावूनचे मालक व चालक हे सुध्दा पाहिजे आरोपी असल्याने त्यांचा शोध चालू आहे. सदर छाप्याच्यावेळी इसम नामे अनिल वसंत पटेल हे मिळून आल्याने त्यास कारवाई कामी पोलिसांनी ताब्यात घेण्यात आले. तसेच सदर मिठी नदीच्या किनारी असलेल्या गोडावूनमध्ये भेसळयुक्त व भेसळयुक्त तेलामधून निघालेला टाकाऊ माल हा मिठी नदीमध्ये सोडला जात होता असे निदर्शनास आले. यावरुन खराब लुब्रिकेंट ऑईलमध्ये केमिकल ऑईल मिक्स करुन सदरचे भेसळयुक्त ऑईल हे खरे आहे, असे भासवून ते किरकोळ व घाऊक भावात विकून फसवणूक करतात, तसेच सदर ऑईल साठवणूक करण्याची परवानगी नसतांना असुरक्षितपणे व बेकायदेशिररित्या साठवणूक केल्याचे दिसून आल्याने सदर सतराही गोडावून मधील द्रवपदार्थाचा साठा पोलीसांनी जप्त केला.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेल्या द्रवपदार्थाचे नमुने पोलीसांनी रासायनिक पृथ:करणासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविले असता, सदर नमुन्यांचा पृथ:करण अहवाल Exhibit Nos. 1 to 17, 19 and 21 contains waste petroleum hydrocarbon oil तसेच Exhibit Nos. 18 and 20 contains lubricating oil असा प्राप्त झालेला आहे. सदर पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने नमुन्यांचा गोदाम निहाय अहवाल पोलिसांकडून मागविण्यात आला असता, गोडावून क्र. १ ते १७ मधील बॅरेलमधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यास अनुक्रमे Exhibit १ ते १७, गोडावून क्र. १ मधील दोन हौदामधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यास Exhibit १८, गोडावून क्र. २ मधील दोन हौदामधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यास Exhibit १९,

गोडावून क्र. ३ मधील हौदामधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यास Exhibit २० तसेच गोडावून क्र. १२ मधील हौदामधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यास Exhibit २१ संबोधण्यात आले असल्याचा अहवाल पोलिसांकडून प्राप्त झाला आहे.

सदर गुन्ह्यातील गोडावून क्र. १, ३ व ४ मधील जप्त साठ्याचे मालक सोहराब अहमद अब्दुल खालक शेख, गोडावून क्र. ६ मधील जप्त साठ्याचे मालक अब्दुल खालीक नबी अहमद कुरेशी, गोडावून क्र. १३ मधील जप्त साठ्याचे मालक मोहम्मद रफिक हमीदुल्लाह शेख व गोडावून क्र. १७ मधील जप्त साठ्याचे मालक मोहम्मद अनिस मोईनुद्दीन खान यांनी "दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७" मधील तरतुदीनुसार ल्युब्रीकेटींग ऑईलचा व्यवसायाकरीता आवश्यक असलेला परवाना संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त केले असल्याचे तसेच सदरचा परवाना वैध असल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तसेच गोडावून क्र. १, ३, ४ व ६ मधील जप्त साठ्याचे मालक यांनी रिक्लेमंड युझ ऑईल, रिक्लेमंड ऑईल व ल्युब ऑईल खरेदी, विक्री केलेली बिले सादर केली असून त्यांच्याकडे असलेल्या लायसन्सनुसार ते ट्रेडिंगचा व्यवसाय करीत असल्याचा खुलासा केला आहे.

त्याचप्रमाणे सदर गोडावून क्र. १, ३, ४, ६, १३ व १७ मधील जप्त साठ्याचे मालक यांनी सुनावणीचेवेळी, पेट्रोलियम द्रवपदार्थाच्या साठवणुकीकरीता आवश्यक असलेला बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील सादर केलेला साठवणूक परवाना पहाता, सदर परवान्याची वैधता समाप्त झाली असल्याचे दिसून येत असून, तो परवाना वैध नसल्याने सबंधित पाचही परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सहसंचालक (एमएमआर) तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका या परवाना प्राधिकरणास स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

सबब, सद्य:परिस्थितीत माझे समोर असलेली उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, गोडावून क्र. १, ३, ४, ६, १३ व १७ मधील जप्त केलेला संपुर्ण द्रवपदार्थाचा साठा तसेच रिकामे ड्रम हे त्यांच्या मुल्याएवढया किंमतीच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर त्यांच्या मालकांस परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

गोडावून क्र. २ मधील जप्त साठ्याचे मालक तनविर ईकरामुल हक खॉन यांनी सुनावणीचेवेळी, दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय, ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार व्यवसायाकरीता आवश्यक असलेला उद्योग सहसंचालक यांचेकडील परवाना क्र. जे.डी.आय./एम.एम.आर./ल्युब ऑईल ॲण्ड ग्रिस ऑर्डर/००४९/२००४ सादर केला आहे. तसेच गोडावून क्र. ५ मधील जप्त साठ्याचे मालक महमंद असरफ अस्मतअली यांनी सुनावणीचेवेळी, दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय, ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार व्यवसायाकरीता आवश्यक

असलेला उद्योग सहसंचालक यांचेकडील परवाना क्र. जे.डी.आय./एम.एम.आर./ल्युब ऑईल अँण्ड ग्रिस ऑर्डर/००६६/०५ सादर केला आहे. तसेच गोडावून क्र. १६ मधील जप्त साठ्याचे मालक मेहंदीहसन हाजी जैनुल्लाह यांनी सुनावणीचेवेळी, दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स अँण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय, अँण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार व्यवसायाकरीता आवश्यक असलेला उद्योग सहसंचालक यांचेकडील परवाना क्र. जे.डी.आय./एम.एम.आर./ल्युब ऑईल अँण्ड ग्रिस ऑर्डर/००१४/२००२ सादर केला आहे.

तथापी, सदर तीन्ही परवान्यावरील वैधता अनुक्रमे दिनांक १२/१२/२००९, १६/१२/२०१० व १६/१२/२००७ रोजी समाप्त झाली असल्याचे दिसून येते. सदर तीन्ही गोडावून मालकांनी परवाना नुतनीकरणाकरीता संबंधित प्राधिकारणाकडे अर्ज केला आहे किंवा कसे, याबाबत कोणताही खुलासा सुनावणीचेवेळी केलेला नाही अथवा त्यासंदर्भात पुरावादर्शक कागदपत्रेही सादर केलेली नाहीत. यावरुन गोडावून क्र. २ मधील जप्त साठ्याचे मालक तनविर ईकरामुल हक खॉन, गोडावून क्र. ५ मधील जप्त साठ्याचे मालक महमद असरफ अस्मतअली तसेच गोडावून क्र. १६ मधील जप्त साठ्याचे मालक मेहंदीहसन हाजी जैनुल्लाह यांनी त्यांच्याकडे असलेल्या अवैध परवान्यावर बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे पेट्रोलियम द्रवपदार्थाची साठवणूक करुन व्यवसाय केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, गोडावून क्र. २, ५ व १६ मधील जप्त केलेला संपुर्ण द्रवपदार्थाचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच सदर गोडावून क्र. २, ५ व १६ मधील जप्त साठ्याचे मालक यांनी त्यांच्याकडे असलेल्या अवैध परवान्यावर पेट्रोलियम द्रवपदार्थाची साठवणूक व व्यवसाय केला असल्याने संबंधित तीन्ही परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सहसंचालक (एमएमआर) या परवाना प्राधिकरणास स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

गोडावून क्र. ७ मधील जप्त साठ्याचे मालक अब्दुल मजीद यार महमंद कुरेशी, गोडावून क्र. ८ व ९ मधील जप्त साठ्याचे मालक महमंद ईलीयास तसेच गोडावून क्र. १० मधील जप्त साठ्याचे मालक इबले हसन अली हसन शेख यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेल्या खुलाशात, सदरचे गोडावून भाड्याने घेवून व्यवसाय करीत असल्याचे नमुद केले आहे. तथापी, दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय, ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार व्यवसायाकरीता आवश्यक असलेला उद्योग सहसंचालक यांचेकडील परवाना त्यांनी सादर केलेला नाही. त्याचप्रमाणे गोडावून क्र. ११ मधील जप्त साठ्याचे मालक अहमद हुसैन नजर महमंद खान यांनीही सदरचा परवाना सादर केलेला नाही. यावरुन गोडावून क्र. ७, ८, ९, १० व ११ मधील जप्त साठ्याचे मालकांनी घटनेच्या ठिकाणी असलेल्या गोडावूनमध्ये विनापरवाना व बेकायदेशीररित्या पेट्रोलियम द्रवपदार्थाची खरेदी, विक्री व साठवणूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने, सदरचा संपुर्ण साठा अवैध ठरतो.

सदर आदेशातील तरतूदीनुसार सदर द्रवपदार्थाच्या व्यवसायाकरीता संबंधीत प्राधिकरणाचा परवाना घेणे आवश्यक असतांनासुध्दा त्यांनी तसा परवाना प्राप्त करुन घेतलेला नाही. सबब, गोडावून क्र. ७, ८, ९, १० व ११ मधील जप्त केलेला संपूर्ण द्रवपदार्थाचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

गोडावून क्र. १२, १४ व १५ मधील जप्त साठ्याचे मालक यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत अथवा खुलासा सादर केलेला नाही. यावरुन प्रस्तुत प्रकरणी सदर जप्त साठ्याचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येत असून, गोडावून क्र. १२, १४ व १५ मधील जप्त साठ्याचे मालकांनी घटनेच्या ठिकाणी असलेल्या गोडावूनमध्ये विनापरवाना व बेकायदेशीररित्या पेट्रोलियम द्रवपदार्थाची खरेदी, विक्री व साठवणूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने सदरचा संपुर्ण साठा अवैध ठरतो. सबब, सदर गोडावून क्र. १२, १४ व १५ मधील जप्त केलेला द्रवपदार्थाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३१/२०११, दि.२९/०१/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :**

१) प्रस्तूत प्रकरणी गोडावून क्र. १ मधील जप्त केलेला २०० लिटर क्षमतेच्या ११२ लोखंडी ड्रममधील द्रवपदार्थ व दोन लोखंडी हौदामधील ३०० लिटर द्रवपदार्थ तसेच ९५ रिकामे ड्रम, गोडावून क्र. ३ मधील जप्त केलेल्या २०० लिटर क्षमतेच्या ३४ लोखंडी ड्रममधील द्रवपदार्थ तसेच २१० रिकामे ड्रम व एक लोखंडी हौदामधील १५० लिटर द्रवपदार्थ तसेच ३ हॉर्सपॉवरची एक मोटार, गोडावून क्र. ४ मधील जप्त केलेला २०० लिटर क्षमतेच्या ३३ लोखंडी ड्रममधील द्रवपदार्थ तसेच २० रिकामे ड्रम व १८ प्लॅस्टिकचे कॅन, गोडावून क्र. ६ मधील जप्त केलेला २०० लिटर क्षमतेच्या २० लोखंडी ड्रममधील द्रवपदार्थ तसेच १० रिकामे ड्रम, गोडावून क्र. १३ मधील जप्त केलेला २०० लिटर क्षमतेच्या २० लोखंडी ड्रममधील द्रवपदार्थ तसेच १२२ रिकामे ड्रम, त्याचप्रमाणे गोडावून क्र. १७ मधील जप्त केलेला २०० लिटर क्षमतेच्या २६



004

लोखंडी ड्रममधील द्रवपदार्थ तसेच १२३ रिकामे ड्रम असा संपुर्ण साठा हा त्यांच्या प्रत्येकी मुल्याएवढया किंमतीचे क्षतीपुर्ती बंधपत्र पोलिसांनी घेऊन त्यांच्या मालकांस परत करण्यात यावा.

२) गोडावून क्र. २, ५, ७, ८, ९, १०, ११, १२, १४, १५ व १६ मधील जप्त करण्यात आलेला संपुर्ण द्रवपदार्थाचा साठा शासनजमा करण्यात यावा. सदरच्या साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) गोडावून क्र. २, ५, ७, ८, ९, १०, ११, १२, १४, १५ व १६ मधील जप्त करण्यात आलेले संपूर्ण एकूण ९५४ लोखंडी रिकामे ड्रम, १० प्लॅस्टिकचे रिकामे ड्रम, ३ हॉर्सपॉवरच्या दोन मोटार, दोन लोखंडी हौद, एक ६ बाय ८ चा हौद इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
१) अनिल वसंत पटेल
२) गोडावून क्र. १, ३ व ४ मधील जप्त साठ्याचे मालक सोहराब
३) गोडावून क्र. २ मधील जप्त साठ्याचे मालक
४) गोडावून क्र. ५ मधील जप्त साठ्याचे मालक
५) गोडावून क्र. ६ मधील जप्त साठ्याचे मालक
६) गोडावून क्र. ७ मधील जप्त साठ्याचे मालक
७) गोडावून क्र. ८ व ९ मधील जप्त साठ्याचे मालक
८) गोडावून क्र. १० मधील जप्त साठ्याचे मालक
९) गोडावून क्र. ११ मधील जप्त साठ्याचे मालक
१०) गोडावून क्र. १२ मधील जप्त साठ्याचे मालक
११) गोडावून क्र. १३ मधील जप्त साठ्याचे मालक
१२) गोडावून क्र. १४ मधील जप्त साठ्याचे मालक

१३) गोडावून क्र. १५ मधील जप्त साठ्याचे मालक

१४) गोडावून क्र. १६ मधील जप्त साठ्याचे मालक

१५) गोडावून क्र. १७ मधील जप्त साठ्याचे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.